आर.सी.सी. क्र.३६०/२०२२

नि.क्र.४२

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – रामदास गोविंद पायमोडे

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – शेती

राहणार– टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर

**फिर्यादीतर्फे सा.क्र.१ यांचा दोषारोपपुर्वीचा सरतपास विधीज्ञ श्री.ए.एल.ब–हाटे यांचेमार्फत**–

माझी भाची कल्पना रेवणनाथ भनगडे हिच्या कामायनी मतीमंद डी.एड. कॉलेज, गोखलेनगर, पुणे येथे प्रवेशासाठी माझा कर्ज व्यवहार ठरला होता. तो व्यवहार रु.५४,०००/– चा होता. ती रक्कम कॉलेजची फी म्हणुन घेतली होती व त्या रकमेस धर रहावा यासाठी साईनाथ बाळासाहेब शेळके यांच्याशी रक्कम रु.५४,०००/– च्या कर्जाबाबत मी गट नं.९१७ मधील ३७ आर + ७ आर खराबा व गट नं.९२२ मध्ये ३० आर जमिन तारण दिली होती. सदर तारण पब्लीक नोटरीपुढे करण्याचे ठरले होते व सदर कर्ज रक्कम ५ महीन्यात व्याजासहीत देण्याचे ठरले होते. त्यानंतर साईनाथ शेळके व त्याचे साथीदार भास्कर लक्ष्मण झावरे व प्रकाश शिवाजी ठुबे यांनी माझ्या को–या कागदावर सहया घेतल्या व त्यास खरेदीखताचा बोगस दस्त दाखवला व त्याची किंमत रु.२,६०,०००/– ठरवली. मला कागद आतमध्ये वाचायला दिल्याचे ठरल्यानंतर मला मात्र कागद वाचायला दिला नाही. त्यांनी दि.२४/१०/२००८ रोजी दुय्यम निबंधक यांचेकडे खरेदीखताचा खोटा कागद बनवुन घेतला. त्या कागदाची मी आरोपींकडुन त्यांनी आज देतो उद्या देतो म्हणुन वाट पाहीली मात्र त्यांनी मला कागद पहायला दिला नाही. त्यानंतर मी मात्र कागदपत्रांच्या नकला काढल्या. त्यावेळी मला माझी त्यांनी फसवणुक केल्याचे समजले. आरोपींनी केलेल्या खरेदीखताची नोंद तलाठीने करताना माझी संमती घेणे गरजेचे होते. मात्र तलाठीने हितसंबंधीतांना नोटीसा पाठवल्या असा बोगस शेरा मारला. मात्र मला त्याबाबत नोटीस मिळाली नाही. तेव्हापासुन ते आजपावेतो माझीच सदर जमिनीमध्ये वहिवाट असुन साईनाथ शेळके कधीही माझ्या जमिनींमध्ये आलेला नाही. माझे सदर जमिनीत फळबागेचे क्षेत्र असतानाही साईनाथ शेळकेने स्टॅम्प डयुटी जास्त भरावी लागु नये याकरीता तशा क्षेत्राची नोंद केली नाही. ती फळबाग मी कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत १९९३–९४ साली केली होती. आरोपी त्याने स्वतः फळबाग केल्याचे खोटे सांगतो. आरोपीने माझी

अडचण करण्यासाठी सदर जमिनींवर राजे शिवाजी पतसंस्थेचा रक्कम रु.३,५०,०००/- चा बोजा चढवला आहे व रक्कम रु.५,००,०००/- चा कान्हुरपठार विविध कार्यकारी सोसायटीचा बोजा चढवला. महसुल कोर्टात त्याचा निकाल माझ्या बाजुने लागला. आरोपीने त्या पतपेढीचा सभासद नसतानाही सभासद आहे असे दाखवुन पतपेढीची फसवणुक केली. आरोपीचे कर्जाचा व्यवहार मी परतफेड करुन त्यास व्याजासहीत रु.१,५४,०००/- दिले आहेत. ते पैसे मी माझ्या मुलाच्या एस.बी.आय.खात्यावरुन आरोपीच्या खात्यावर रु.१,००,०००/- वर्ग केले व उर्वरीत रक्कम रु.५४,०००/- मी साक्षीदार संदीप बाळासाहेब रांधवन आणि भास्कर गोविंद पायमोडे यांच्यासमक्ष मी साईनाथ शेळके यास रोख दिले. साईनाथ शेळके याने मी सोसायटीचा बोजा कमी करुन खरेदीखत पलटवुन देतो असे सांगितले मात्र आरोपीने अद्याप ते खरेदीखत पलटवुन दिले नाही. आरोपीची खरेदीखत पलटवुन देण्याची ईच्छा नसल्याने मी कोर्टात दावा दाखल केला. आरोपीने माझी घोर फसवणुक केली आहे. आरोपीस कडक शिक्षा व्हावी. मला आर्थिक व मानसिक त्रास झाला आहे.

सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २२/०९/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.